## प्रकरण - ६ वे - शिक्षण संक्रमण

प्राचीन काळापासून भारतात अध्यापनकार्य हे अत्यंत महत्वाचे मानले गेले. पण अति प्राचीन काळी गुरुशिष्य संवाद नव्हता. साक्षात्कृतधर्माण ऋषयो बभूवु: । - ऋषीमुनी आपल्या तपोबलाने वेदांच्या साक्षात्काराने ज्ञानप्राप्ती करून घेत असत. नंतर या द्रष्ट्या ऋषींनी ज्ञानोपदेशास सुरुवात केली. ज्या विद्यार्थ्यांना स्वत: प्रत्यक्ष ज्ञानप्राप्ती करून घेणे अशक्य होते अशा शिष्याना हे ज्ञान गुरु अध्यापनाने देत असत. नंतर हा उपदेश यथावत ग्रहण करण्यास विद्यार्थी असमर्थ होउ लागले. तेव्हा वेद-वेदांगे इ. ग्रंथाच्या रूपाने ज्ञान संगृहित झाले. तेव्हा पासून अध्ययन अध्यापन ही प्रक्रिया सुरु झाली.

ज्ञान हे दोन प्रकारे विभागले गेले. पराविद्या व अपराविद्या. धर्म, अर्थ, काम हे तीन पुरुषार्थ प्राप्त करून घेण्यासाठी अपरा विद्या आणि मोक्ष या पुरुषार्थासाठी पराविद्या हे साधन होते. शिक्षणाचे परम ध्येय मोक्ष किंवा आत्मप्राप्ती असल्याने त्यासाठी शिष्याला सद्गुरुंचा आश्रय घ्यावा लागत असे. जिज्ञासू शिष्य इष्टप्राप्तीसाठी म्हणजेच मोक्ष प्राप्तीसाठी - आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी - गुरूंना शरण जात असल्याचे उपनिषदात सांगितले आहे - समाश्रयेत् सद्गुरुमात्मलब्धये ।[१]

शिष्य, गुरुंच्याकडे गेल्यानंतर ते गुरु त्यांच्या अज्ञानाचे निवारण करीत. गुरु म्हणजे शिष्याचे सर्व काही. जणू ते त्याचे ब्रह्मा - विष्णू - महेश होत. शरण आलेल्याला अध्यात्मज्ञान प्राप्त करुन दिल्याने - ब्रह्मा म्हणता येईल. तसेच ज्ञान - विज्ञानाच्या संरक्षणाने - विष्णू, आणि सर्व अज्ञानाचा संहार केल्याने - महेश असे म्हणता येईल.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु: गुरुर्देवो महेश्वर: ।
गुरु: साक्षात् परंब्रह्म तस्मै श्रीगुरवे नम: ।।

आत्मज्ञानाचा गहन विषय स्पष्ट करुन सांगण्याची आणि दुर्बोध विषयावर उद्बोधक विवेचन करण्याची गुरुची हातोटी अवर्णनीय म्हणावी लागेल. व्याकरण, पूर्व - उत्तर मीमांसा, न्याय, सांख्य इ. विषयावरील सूत्र ग्रंथ केवळ पोपटपंचीने अभ्यास करण्याजोगे नाहीत. म्हणून याठिकाणी ज्ञानी गुरुंची आवश्यकता आहे -
तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् । [२]
तस्माद् गुरुं प्रपद्येत जिज्ञासु: श्रेय उत्तमम् । [3]

गुरुंच्या सहाय्याने शिष्याचे शिक्षण सुरु होई. गृहस्थाच्या पाच महायज्ञात ब्रह्मयज्ञाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. 'अध्यापनं ब्रह्मयज्ञ:'

प्रत्येक विद्वान गृहस्थाकडे काही शिष्य अध्ययनासाठी येत असत. त्यांच्यामध्ये आचार्यांचे पुत्रही असत. आचार्यांचे घर हे विद्यालयच असे. वैदिक काळात विद्यालयांचे स्वरुप गुरुकुल स्वरुपाचे होते.

प्राचीन काळी उद्दालक - आरुणि व उपकोसल गुरुगृही रहात असल्याचा उपनिषदात उल्लेख आहेच. गुरुंचे निवास स्थान नगरापासून

दूर असे. ज्याठिकाणी गुराना चारा भरपूर मिळेल, होमाच्या समिधा सहज उपलब्ध होतील, स्नानासाठी सरोवर किंवा नदी, जवळ असेल अशा ठिकाणी गुरुंचे निवासस्थान असे. तत्कालीन विद्यार्थी - जीवनात ब्रह्मचर्य आणि तपाचरण याना महत्व होते. या दोन्ही गोष्टीसाठी गावापासून दूर रहाणे योग्य होते. उपनिषदात ब्रह्मज्ञानाचे शिक्षण देणारे ऋषी - मुनी अरण्यातच रहात असत. ब्रह्मजिज्ञासा असणारे व अधिकारी असे शिष्य त्यांच्याकडे जात. उदा. सुकेशा, सौर्यामणि, कौसल्य, सत्यकाम, भार्गव, कबंधी हे पिप्पलाद मुनींच्या आश्रमात शिकत होते.

प्राचीनकाळी उपनयन संस्कारानंतर विद्यार्थी गुरुंच्या आश्रमात प्रवेश करी. १२ ते १४ वर्षे निरंतर अध्ययन करी. नंतर त्याचे समावर्तन होई. दीक्षांत विधीनंतर त्याला स्नातक ही पदवी प्राप्त होत असे. आचार्यांकडून वरचेवर शिष्याची परीक्षा घेतली जाई. शिक्षण समाप्तीनंतर गुरुकुल सोडत असताना गुरु त्याना सदुपदेश करीत

"सत्यं वद। धर्मं चर।-४--इ."

गृहस्थ धर्मात पदार्पण करण्यापूर्वी योग्य त्या सूचना या उपदेशातून दिल्या जात. विद्याग्रहणानंतर विद्यार्थी यथाशक्ती गुरुदक्षिणा देत असत. गुरुदक्षिणा विद्यार्थ्याने कुवतीप्रमाणे द्यावी. गरीब विद्यार्थ्यांनी शिक्षण संपल्यावर भिक्षा मागून किंवा आपल्या हिंमतीवर पैसे मिळवून गुरुंच्या उपकाराची परतफेड करावी असे म्हटले आहे. गुरुदक्षिणेचे महत्व पुढील श्लोकात सांगितले आहे.

एकमप्याक्षरं यस्तु गुरु: शिष्ये निवेदयेत्।
पृथिव्यां नास्ति तद्द्रव्य यद्द त्वाऽ नृणी भावेत्।।[५]

गुरुदक्षिणा दिल्यानंतर गुरुशिष्याचे संबंध संपत नसत. तर नंतरही ते एकमेकाना भेटायला जात असत. गुरुंकडे जाताना शिष्य भेटवस्तू घेऊन जात असत. आणि गुरुही त्यांच्या शिक्षणाबद्दल आस्थेने चौकशी करीत असत. विसरलेले अध्ययन पुन्हा करण्याची कबुली एका शिष्याने दिल्याचे वचन आ. धर्मसूत्रात [१. ३. ८. २०] व कोम्भेय - जातकात दिसून येते.

गृहस्थ धर्म स्वीकारल्यानंतरही शिकलेली विद्या विसरु नये म्हणून उपाकर्म व उत्सर्जन हे विधी समाजात सक्तीचे करण्यात आले होते. त्यात गुरुगृही जाऊन पुन्हा विसरलेला अभ्यास करावा लागे. नंतर या विधीचे रुपांतर श्रावणीमध्ये झाले असावे.

शिक्षण पूर्वी आश्रमात - सुंदर निसर्गाच्या सान्निध्यात दिले जाई. महाभारत काळात हरिद्वार, बदरीनाथ इ. ठिकाणी आश्रम होते. व्यास महर्षींचा हिमालय पर्वतावर बदरीक्षेत्री तर कण्वमुनींचा मालिनी नदीच्या तटावर होता. रामायण काळात प्रयाग येथे भारद्वाज मुनींचा रम्य आश्रम होता. अगस्तींचा दंडकारण्यात होता. व्यास महर्षी सुमन्तु, जैमिनी, वैशम्पायन इ. ना वेद शिकवित. कण्व मुनींच्या आश्रमात न्यायतत्व, आत्मज्ञान, मोक्षशास्त्र, तर्क, व्याकरण, छंद, निरुक्त, इ. विषयांचे प्रसिध्द आचार्य होते. या आश्रमातून होम-हवन, वैदिकमंत्रांचे पठन होत असे. त्यामुळे हे आश्रम - शोभून दिसत. आश्रमात ऋषींच्या बरोबर पशू - पक्षी राहत असत. विद्यार्थ्यांसाठी राहायला पर्णकुटी तयार केली जात असे.

महाभारत काळापासून तक्षशिला येथील विश्व विद्यालय उत्तरभारतात प्रसिध्द आहे. येथे आचार्य धौम्य आणि त्यांचे शिष्य उपमन्यु व आरुणि यांचे अध्यापन व अध्ययन झाले.

जातक कथानुसार तक्षशिलेकडे काशी, राजगृह, पांचाल, मिथिला, उज्जयिनी इ. ठिकाणांहून विद्यार्थी जात असत. पाणिनी कौटिल्य यांचे शिक्षणही तक्षशिलेलाच झाले असावे. तक्षशिला शिकंदराच्या काळातही विद्वानांसाठी प्रसिध्द होती. गौतमबुध्दाच्या काळातही येथे आयुर्वेदाचे शिक्षण घेतले जात असे.

त्याकाळातही काशी हे भारतीय विद्यांसाठी शिक्षण क्षेत्र म्हणून प्रसिध्द. जातक कथानुसार, बोधिसत्वाचे आचार्य झाल्यानंतर पाचशे विद्यार्थी वैदिक साहित्याचे अध्ययन करीत असत. वेगवेगळ्या राज्यातून क्षत्रिय व ब्राह्मण शिक्षणासाठी येत असत. या आश्रमातून चौदा विद्यांचे शिक्षण दिल्याचे परंतु ऋषींचे उदाहरण प्रसिध्द आहेच.

सातव्या शतकात बाणाच्या कादंबरीत जाबालींच्या आश्रमाचे उदाहरण आलेले आहे. विद्यालयात विद्यार्थ्यांच्या अध्ययनाने आश्रम दुमदुमून जाई. याठिकाणी वैदिक साहित्य, दर्शन, याज्ञिक विधाने इ. चे शिक्षण दिले जाई.

आठव्या शतकानंतर भृतक अध्यापन पध्दती सुरु झाली असावी. त्यापूर्वी मासिक वेतन देणा-या शिक्षण संस्था अस्तित्वात नव्हत्या. वेदान्त विषयाच्या अध्यापकास दरसाल ४८० कलम भात वेतन म्हणून मिळत असे. इतर विषयाच्या अध्यापकाना त्यापेक्षा कमी वेतन असे.

दहाव्या शतकापासून देवालयात शिक्षण संस्था चालू केल्याचा उल्लेख सापडतो. स्कंदपुराणानुसार सरस्वतीच्या मंदिरात विद्यादान हे पुण्य कर्म मानले जात असे.

अकराव्या शतकात अर्काट प्रदेशात "स्नरियम" च्या वैदिक शिक्षणाचा आरंभ झाल्याचा उल्लेख आहे. येथे तीनशे ते चारशे विद्यार्थ्यांच्या अध्यापनाची व्यवस्था होती.

चौदाव्या शतकापर्यंत विजापूरात मनगोली, कर्नाटकात बेळगांव इ. ठिकाणी अनेक विद्यामंदिरांची स्थापना झालेली होती.

विद्वान ब्राह्मणांच्या उदरनिर्वाहाची काळजी राजेलोकही घेत असत. राजे किंवा श्रीमंत लोक जमिन किंवा अन्न यांचे दान करीत असत. काहीवेळा "गांव" असे दानाच्या स्वरुपात दिले जाई. यालाच 'अग्रहार' असे म्हणतात.

गुरुकुलातून परतलेल्या स्नातकाना हे अग्रहार मिळत असे. त्यांचा उपभोग घेणारे ब्राह्मण स्वाध्याय व अध्यापनात निश्चिंत असत.

गौतमबुद्धाच्या काळात बौद्ध विहार असत. येथे धार्मिक शिक्षण दिले जाई. त्यात लौकिक शिक्षणही असे. बौद्धभिक्षु जन्मभर तेथे राहत. नालंदा, विक्रमशिलाचे बौद्ध विश्वविद्यालय सर्व आशिया खंडात उच्च शिक्षणासाठी प्रख्यात होते.

बौद्ध धर्मातही गुरुचे महत्व अतिशय असल्याचे दिसून येते. बौद्ध संघात आलेल्या नवभिक्षुने दहा वर्षे सतत गुरुच्या देखरेखी-खाली राहून अध्ययन केले पाहिजे असा बुद्धाचा कटाक्ष होता.

उपनिषात्काळात धर्मशिक्षण व धंदेशिक्षण अशी फारकत तेव्हा झालेली नव्हती. ब्रह्म - विद्या शिकण्यास आलेल्या नारदास सनत्कुमार विचारतात - "तुला काय काय येते ? " तो सांगतो - "ज्योतिष, लष्करी विद्या, गायन कला, जादूटोणे इ. मला येते".

वेदविद्येबरोबरच ब्राह्मण व क्षत्रिय दोघेही वेद, शिल्पकला इ. शिकत असल्याचे दिसते. शिक्षण क्षेत्रात जातीची बंधने नव्हती त्यामुळे प्राचीन काळी वाङ्मय, तत्वज्ञान, उद्योगधंदे, भौतिक कला यांचा विस्तार व प्रगती झपाट्याने झाल्याचे दिसून येते. स्मृतिकाळात वेदांच्या अभ्यासावरून चतुर्वेदी, त्रिवेदी, द्विवेदी अशी ब्राह्मणांची नांवे पडल्याचे दिसून येते. पूर्वीच्याकाळी साधी राहणी व उच्च विचारसरणी हे ध्येय दिसून येते. विचार स्वातंत्र्य, गुरुकुल पध्दती, सार्वत्रिक शिक्षण, वाङ्मयात्मक व उपयुक्त शिक्षणाची सांगड ही तत्वे दिसून येतात. शीलसंवर्धन, उत्तम गुणपरिपोष, व्यक्ती विकास, स्वकर्तव्यदक्षता, प्राचीन संस्कृतीचे रक्षण इ. गोष्टींचा शिक्षण क्षेत्रात विचार केला जाई.

हिंदुस्थानात शिक्षण क्षेत्रात बौध्द, जैन, हिंदू धर्मांचा व संस्कृतीचा प्रभाव पडत गेला. नंतर परकीय आक्रमणे होत गेली. मुसलमानांचा अंमल प्रस्थापित होईपर्यंत विद्याभ्यासामध्ये हिंदुस्थान सर्व जगात पुढारलेला होता. तेराव्याशतकानंतर उत्तरोत्तर परकीय सत्ता, मुस्लिम नंतर इंग्रज सत्ता हिंदुस्थानात आल्याने हिंदुस्थानात शैक्षणिक क्षेत्रात व इतर क्षेत्रात -हास झाल्याचे दिसून येते. पण याचवेळी पाश्चात्य देशात ज्ञानाच्या क्षेत्रात विलक्षण प्रगती होऊ -

लागली. हिंदुस्थानातील ज्ञानसंपत्ती पाश्चात देशात नेली जाउ लागली.

इंग्रजीसत्ता भारतात असताना कारकुनी शिक्षण देण्यात येउ लागले. त्या शिक्षणाने हिंदुस्थानी माणसाचा स्वाभिमान जागा करण्याकडे कल नव्हता. इंग्रजांची चाकरी करण्यापुरते शिक्षण दिले जाई. शिक्षण क्षेत्रात बुध्दीचा व आत्म्याचा विकास इ. गोष्टी लोप होउ लागल्या. सामान्य जनांची जिज्ञासू वृत्ती लोपत चालली. शिक्षणाचे मुख्य उद्दिष्टच नाहीसे झाले.

## शिक्षण पध्दती - जुनी व नवी - तुलनात्मक अभ्यास

प्राचीन काळी गुरुकुल किंवा आश्रम ही शिक्षणकेंद्रे होती. तेथे प्रामुख्याने धर्मार्थ शिक्षण दिले जाई.

> - अध्यापनं च त्रिविधं धर्मार्थं वार्थकारणात् ।
> शुश्रूषाकरणं चेति ऋषिभि: परिकीर्तितम् ।।[6]
>
> आचार्य आचारं ग्राहयति । आचिनोति अर्थान्,
> आचिनोति बुध्दिमिति वा ।।[7]

पूर्वीच्याकाळी चारित्र्यनिर्माण करणे, गूढ उकलणे आणि शिष्यांची बुध्दिमत्ता वाढविणे हे कार्य आचार्य करीत. गुरुंच्या आश्रमात पवित्र वातावरणात अध्ययन करणारे शिष्य विनयशील असत.

"विद्या ददाति विनयम् ।"

संयमी, कर्तव्यनिष्ठ, सत्यपरायण, चारित्र्यवान,श्रध्दाळू, आज्ञाधारक असे शिष्य सुजाण नागरिक बनूनच गुरुकुलातून बाहेर पडत. पदवीधर विद्यार्थी "सत्यं वद, धर्म चर"— असा सदुपदेश ग्रहण करून ज्ञान व आचरणाचे धडे प्रत्यक्ष व्यवहारात वापरीत असत. गुरुजनांबद्दल त्यांच्यामनात सतत आदराची भावना असे. त्यांच्याकडून नैतिक मूल्ये पायदळी तुडविली जात नसत. मूल्यांची कदर करताना स्वार्थावर पाणी सोडावे लागे. माणुसकी जपली जाई. समाजाचे, राष्ट्राचे हित हेच आपले हित समजून वागावे लागे. शिक्षणाचे व जीवनाचे ध्येय विशाल होते त्याच्या पूर्तीसाठी आयुष्यभर प्रयत्न केले जात. यामुळे पूर्वीच्याकाळी समाजात, राष्ट्रात सुख-समाधान-आनंद उपभोगता येत होता.

विद्यादान हे श्रेष्ठ कार्य मानले जात होते. गुरु ते कार्य अतिशय दक्षतेने पार पाडीत. तर शिष्य, गुरुंची सेवा करण्यात सद्भाग्य मानीत होते. अशातऱ्हेने सामाजिक बांधिलकीचे शिक्षण दिले जात असे.

गुरु - शिष्यांचे जिव्हाळ्याचे नाते होते. त्यांच्यात तन्मयता दिसून येई. पैशाच्या अपेक्षेने शिक्षण हो क्षुल्लक स्वार्थी भावना अध्यापनामागे नसे. विनावेतन अध्यापन चालत असे. गुरुंचे जीवनकार्य अध्यापनात वाहून घेतलेले असे. असे हे शिक्षण बहुमोल असे. उदात्त पातळीचे असे. त्याची तुलनाच कशाशी करणे योग्य नाही.

ही उदात्त शिक्षण पध्दती हळूहळू लोप पावू लागली. शिक्षणाचा अध्यात्मिक पाया ढासळू लागला आणि भौतिक, वैज्ञानिक मूल्येच फक्त जोपासली जाउ लागली. जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन फक्त ऐहिकच उरला. पाश्चात्यांचे अंधानुकरण होउ लागले. शिक्षणाला बाजारी स्वरूप प्राप्त झाले, गुरु-शिष्यांचे पवित्र नाते दुरावले. संस्काराचे मूल्य, पावित्र्य कमी होऊन शिक्षणाला व्यावसायिक स्वरूप प्राप्त झाले.

पूर्वीच्याकाळी शिक्षण संस्था ह्या आश्रमशाळा किंवा विद्वत्सभांच्या स्वरूपात अस्तित्वात होत्या. त्यात अत्यंत श्रेष्ठ विद्वानांची गणना होत असे. राजेलोक ह्या विद्वानांना आमंत्रण देऊन सन्मान करीत. ह्या विद्वानांच्या सभेमध्ये वेळोवेळी सामाजिक धार्मिक - राजकिय समस्यांवर विचार करून देश, काळ, नीती, धर्म इ. प्रश्नांचा निर्णय योग्यरीतीने दिला जाई. हा निर्णय राजा व प्रजा दोहोंना मानावा लागे. म्हणजेच राजे लोकांपेक्षाही श्रेष्ठ अशी शिक्षण संस्था पूर्वीच्याकाळी होती.

या विद्वानांच्या ज्ञानसंपत्तीचे आकर्षण परदेशी विद्यार्थ्यांना-ही असे. असे विद्यार्थी ज्ञान साधना करण्यास, शंका निरसन करण्यास लांबून - परप्रांतातून भारतात येत असत. या विद्वत्सभांचे रूपांतर विश्वविद्यालयाच्या स्वरूपात झाले. नालंदा, काशी व तक्षशिला ही प्रसिध्द अशी शिक्षण केंद्रे होती.

एकेकाळी प्रगतीच्या उत्तुंग शिखरावर असणारी भारतातील शिक्षण पध्दती परकीय आक्रमणाने कोलमडली. त्यातील उदात्तता

नाहीशी झाली. "मुक्ती देणारी विद्या" हा शिक्षणाचा अर्थ व इतर उद्दीष्टे लुप्त झाली.

काळाच्या ओघात वैज्ञानिक शिक्षण व तांत्रिक शिक्षण यांचा प्रभाव पडू लागला. ऐहिक प्रगतीकडे जास्त लक्ष दिले जाऊ लागले. पैसा हे जीवनाचे श्रेष्ठ उद्दिष्ट मानले जाऊ लागले. त्यामुळे शिक्षकी पेशा प्रामुख्याने व्यवसाय बनला. संस्कारापेक्षा वेतनाकडे लक्ष दिले जाऊ लागले. त्यामुळे अध्ययन - अध्यापनातील तन्मयता, एकाग्रता कमी होऊ लागली. प्राचीन ज्ञान व संस्कृति व वाङ्‌मय यांचे शिक्षणामुळे संगोपन होऊन त्यात काही काळपर्यंत सतत भार पडत गेली पण नंतर युरोपमध्ये ज्ञानशाखांची एकसारखी प्रगती होऊ लागली आणि हिंदुस्थानात मात्र उतरती कळा लागली.

एकेकाळी अध्यापन कार्य एक श्रेष्ठ मूल्य समजले जात होते पण नंतर तो एक सामान्य व्यवसाय बनला. इतर व्यवसायाप्रमाणे त्याची गणना होऊ लागली.

१८३५ मध्ये भारतात वर्तमान शिक्षण पध्दतीचा पाया त्यावेळचे भारताचे गव्हर्नर"लॉर्ड मेकॉलेने"घातला. तेव्हापासून पाश्चात्य मूल्ये आपल्या शिक्षण पध्दतीत रुजली गेली.

एकेकाळी विद्वानाना मिळत असलेला राजाश्रय, त्यांच्या विद्वत्तेचा होणारा गौरव,पारतंत्र्याच्या सावटामध्ये नाहीसे होऊ लागले. इंग्रजी भाषेचा पगडा आपल्या देशात बसू लागला. परकीय भाषेबरोबर हिंदुस्थानातील लोक स्वाभिमान विसरले. स्वतंत्र विचार करण्याची त्यांची प्रवृत्ती नाहीशी होऊ लागली. आत्मिक

प्रगती खुंटली. शिक्षण क्षेत्रातील जिज्ञासू वृत्ती लोप पावली. शिक्षणाचा उद्देशपोट भरण्याचे साधन व इंग्रजांची प्रामाणिकपणे चाकरी एवढाच उरला.

शिक्षण औपचारिक बनू लागले. पुस्तकी शिक्षण आले. संस्कार, उच्चार, आचार यांचो मुळे काढून टाकलेले शिक्षण रूढ झाले. गुरुशिष्यातील जिव्हाळा जाऊन सक्तीचे व नीरस शिक्षण सुरु झाले.

परीक्षा पध्दतीला अवाजवी महत्व दिले जाऊ लागले. परीक्षा पध्दतीमुळे सखोल अभ्यास करण्याची प्रवृत्ती जाऊन परीक्षेत मार्क मिळविणे, हेच शिक्षणाचे उद्दिष्ट बनले. मार्कांची तीव्र स्पर्धा वाढू लागली. आजच्या काळात तर परीक्षा हे ध्येय डोळ्यापुढे ठेऊनच अभ्यास करण्याची विद्यार्थ्यांची वाढती प्रवृत्ती दिसते. त्यादृष्टीने मार्गदर्शक, अपेक्षित संच, तयार प्रश्नोत्तरे यांचाच अभ्यास करण्याची विद्यार्थ्यांची वाढती प्रवृत्ती बनली. शाळा कॉलेजमध्ये सुध्दा परीक्षेचा विचार करूनच शिक्षण दिले जाऊ लागले. कमीतकमी वेळात जास्तीत जास्त अभ्यास व्हावा म्हणून शिक्षक ही तयार ज्ञान [Spoon feeding.] देऊ लागले. परीक्षेत पास व्हावे किंवा जास्तीत जास्त मार्क मिळवावे म्हणून क्लासेस चे प्रमाण वाढू लागले.

शिक्षकांच्या आदर्शाचे अनुकरण करण्याऐवजी, ज्ञानाचा आदर्श डोळ्यासमोर न ठेवता बाह्य गोष्टींचे अनुकरण होऊ लागले. चित्रपट सृष्टीचे वाढते आकर्षण, दूरदर्शन, टेपरेकॉर्डर इ. मुळे विद्यार्थी जीवनावर विपरीत परिणाम होऊ लागला. पूर्वीचे आदर्श जाऊन फॅशनचे अनुकरण विद्यार्थी करु लागले. वैज्ञानिक शोधामुळे

भौतिक सुखाकडे विद्यार्थ्यांचा कल वळू लागला. परीक्षेसाठी अभ्यास होऊ लागला. त्यामुळे ज्ञानाची सखोलता, शिक्षणाची व संस्काराची उदात्तता कमी झाली.

शिक्षण क्षेत्रात, ज्ञानावर प्रभुत्व नसलेला मनुष्य शिक्षक म्हणून काम करु लागल्याने विद्यादानाचे श्रेष्ठ कार्य करण्यात तो कमी पडू लागला. एकंदरीत शिक्षकी पेशाकडे तुच्छतेने पहाण्याचा समाजाचा दृष्टीकोन तयार होऊ लागला. हुशार विद्यार्थी डॉक्टर किंवा इंजिनीअर बनू लागले. आदर्श शिक्षक बनण्याचे ध्येय विद्यार्थ्यात राहिले नाही. एकंदरीत शिक्षण क्षेत्राची हेळसांड झाली.

अशा या शिक्षणामुळे वाढती बेकारी निर्माण झाली. शिक्षणाच्या स्पर्धेत टिकाव न लागल्याने उदासीनता, नैराश्य पदरी येऊ लागले. सर्व क्षेत्राप्रमाणेच शिक्षण क्षेत्रातही भ्रष्टाचार बोकाळू लागला, त्यामुळे बहुसंख्य समाजाचे स्वास्थ्य हरपले. भावी पिढीच्या भवितव्याची चिंता निर्माण झाली.

आजचे शिक्षण पुस्तकी शिक्षण आहे. सर्वसामान्यांना न परवडणारे, खर्चिक तसेच पुस्तके वह्या यांचे ओझे वाहून विद्यार्थ्यांची दमणूक होते. अभ्यास करण्यास या धाकाधकीच्या जगात त्याना उत्साह वाटत नाही. वैयक्तिक शिक्षणाकडे दुर्लक्ष झाल्याने विद्यार्थ्याना खऱ्या अर्थाने शिक्षकांचे मार्गदर्शन मिळत नाही. शिक्षक - विद्यार्थी, विद्यार्थी - पालक, आणि शिक्षक-पालक यांचे संबंध दुरावत आहेत.

हे सर्व कुठेतरी थांबायला पाहिजे. परीक्षा पध्दतीत सुधारणा घडवून शिक्षण पध्दतीतच आमूलाग्र बदल घडविला पाहिजे.

## चांगली शिक्षण पध्दती - आजच्या काळाची गरज

शिक्षण क्षेत्रात सुधारणा घडवून आणायची असेल तर शिक्षकाची निवड करताना त्याचे त्या विषयातील ज्ञान पुरेसे आहे का? तसेच शिकविण्याची पध्दती चांगली आहे का?, हे प्रामुख्याने पाहिले पाहिजे. शिक्षकाला विद्यार्थ्यांबद्दल आस्था पाहिजे. ज्ञान देण्याची कला आत्मसात पाहिजे. इ. गुण असणारा शिक्षक, जातीने कोणीही असला तरी चालेल. तो विद्यार्थ्यात ज्ञानाची गोडी निर्माण करु शकतो. विद्यार्थ्यांच्या शंका कुशंकांचे यथायोग्य समाधान करतो.

अशा शिक्षकाला हुषार व कलावंत विद्यार्थ्यांची पारख करता आली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्यात चांगला असणारा गुण शोधून त्याला त्यात वाव दिला तरच त्या विद्यार्थ्यांचे कल्याण होईल. विद्यार्थ्यांच्या गुणांचा उपयोग समाजालाही होईल.

समाजाने व शासनाने विद्यार्थी व शिक्षक याना साहाय्य केले पाहिजे. हुषार व परिश्रम करणा-या विद्यार्थ्यांच्या पदरी अपयश, निराशा येणार नाही; तर त्यांच्या कर्तृत्वाची विविध दालने उघडता येतील हे पाहिले पाहिजे. हुषार विद्यार्थी परदेशी जाऊन त्यांच्या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

बुध्दीचे, कष्टाचे चीज परदेशात करून पैसा मिळवितात. त्याऐवजी अशा विद्यार्थ्यांना आपल्या देशातच वाव मिळाला पाहिजे.

सध्याचे सरकार आदर्श प्राध्यापक व आदर्श शिक्षकांना पुरस्कार देऊन सत्कार करते. ही गोष्ट चांगली आहे. तसेच हुषार मुलानाही शिष्यवृत्त्या दिल्या जातात ही गोष्टही स्तुत्य आहे.

जग झपाट्याने पुढे जात आहे. प्रत्येकजण या वेगवान गतीत सापडलेला आहे. काळाच्या गतीबरोबरच नवीन सुधारणा आपलेसे करून जुन्या संस्कारांना उजाळा देणे आवश्यक आहे. त्यासाठी चांगल्या शिक्षकाची गरज आहे. आजच्या काळात शिक्षकांनी ज्ञान देताना ते योग्यायोग्य असल्याचे पारखून मगच ते विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. विद्यार्थ्याबद्दल जिव्हाळा असला पाहिजे. विद्यार्थ्यांची जिज्ञासा पूर्ण करणे, त्यांना स्वत: ज्ञान मिळविण्यास जागृत करणे, स्वावलंबी बनविणे आवश्यक आहे. वास्तववादी जीवन जगताना योग्य तो निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण व्हायला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्यास स्वत:मध्ये असणाऱ्या गुणांची जाणीव करून देणे, त्यांचा विकास घडवून आणण्यास मदत करणे, प्रोत्साहन देणे हे काम शिक्षकाचे आहे. शिक्षकाने स्वत: उद्योगप्रिय, प्रामाणिक असले पाहिजे तरच ते विद्यार्थ्यापुढे चांगला आदर्श ठरतील. शिक्षक हा विद्यार्थ्यांचा खरा मित्र, मार्गदर्शक व तत्वज्ञ असावा.

Teacher is a Friend, Philosopher and Guide.

यावरून शिक्षकाच्या भूमिकेचे वैशिष्ट्य व महत्व लक्षात येते.

शारीरिक शिक्षणाकडेही दुर्लक्ष केले जाऊ नये, कारण शारीरिक शिक्षणातून शारीरिक विकासा बरोबरच स्वयंशिस्त,

परस्पर सहकार्याची भावना, नि:स्वार्थीवृत्ती, खिलाडूपणा, स्काग्रता आत्मविश्वास, इच्छाशक्ती या वृत्तींची जोपासना होते. जीवनातील ताणतणाव दूर करण्यासाठी समायोजनाचे शिक्षण दिले गेले पाहिजे.

शिक्षणाच्या तत्वज्ञानाच्या अभ्यास अनेक विचारवंतानी केला आहे. त्यादृष्टीने शिक्षणाची व्याख्या त्यानी मांडली आहे.

१] प्लेटो - "Education is giving to the body and soul, all perfection of which they are Susceptible."

बालकातील निसर्ग शक्ती जागृत करून त्या अंत:शक्तीचा अविष्कार व विकास करणे हे शिक्षकाचे म्हणजेच शिक्षणाचे काम आहे, निकोप व्यक्तिमत्व, प्रसन्न व निरामय होण्यासाठी आदर्शवादी तत्वज्ञान आवश्यक आहे.

२] रूसो - निसर्ग हा खरा शिक्षक,म्हणून शिक्षकानी बालकाच्या विकासाला अनुकूल वातावरण तयार केले पाहिजे.

३] फ्रोबेल - शिक्षक हा माळी असून रोपट्याप्रमाणे त्याने बालकाचा विकास केला पाहिजे. म्हणजेच मुलांच्या सुप्त गुणांचा विकास घडवून आणणे, त्याला प्रोत्साहन देणे या गोष्टी आवश्यक आहेत.

महात्मा गांधींच्या मते धर्म व जीवन यांचा संबंध अतूट आहे. धर्म म्हणजे तत्वज्ञान, जीवन विषयक मूल्य तत्वज्ञानातून स्फुरतात त्याचा प्रभाव शिक्षणावर पडतो.

स्कंदरीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय संस्कृतीचे मूलभूत शिक्षण आवश्यक आहे. नैतिक व आध्यात्मिक पायावरच शिक्षण आधारीत असले पाहिजे. त्यासाठी शिक्षणा बरोबरच सुसंस्काराची आवश्यकता आहे.

टीका :-

१] अध्यात्मरामायण

२] मुंडकोपनिषाद् [१. २ १३]

३] श्रीमद्भागवत

४] तैत्तरीय उप.

५] मनुस्मृति .

६] हारीत: .

७] निरुक्त .